# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 30 May 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ३० मे २०२६ सायंकाळी ६.१०

****

- मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारची भूमिका सकारात्मक आणि पारदर्शक असल्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्वाळा
- आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मनोज जरांगे यांचं अंतरवाली सराटी इथं बेमुदत उपोषण
- माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश
- छत्रपती संभाजीनगरच्या नवीन पाणीपुरवठा योजनेत पाण्याचा गढूळपणा नीचांकी पातळीवर आणण्यात यंत्रणेला यश

आणि

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताची सात्विक-चिराग शेट्टी जोडी अंतिम फेरीत दाखल

****

मराठा आरक्षणाच्या संदर्भात सरकारची भूमिका सकारात्मक आणि पारदर्शक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. मराठा आरक्षणाबाबत न्यायालयीन निर्णय आणि संविधान याच्या चौकटीत राहूनच सर्व निर्णय घेतले जातील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मनोज जरांगे यांनी आजपासून अंतरवाली सराटी इथं पुन्हा बेमुदत उपोषण सुरु केलं. दिलेल्या इशाऱ्यानुसार रस्त्यालगत बाज टाकून भर उन्हात ते उपोषणाला बसले. मराठा-कुणबी मंत्रालय सुरू करा, सातारा संस्थानचा

जीआर काढा, गॅझेटियरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, जात वैधता प्रमाणपत्र द्या, आदी मागण्या त्यांनी केल्या आहेत.

राज्य सरकारकडून मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह शिष्टमंडळानं काल आणि आजही जरांगे यांची भेट घेतली. त्यांनी एक मसुदा सादर करुन आवश्यक सूचना करण्याची विनंती जरांगे यांना केली. त्यावर अधिकृत शासन आदेश जारी होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी भूमिका जरांगे यांनी घेतली. दरम्यान, जरांगे यांच्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी मुंबई नागपूर समृध्दी महामार्गावर जालना हद्दीतल्या नाव्हा परिसरात मराठा बांधवांनी रास्ता रोको आंदोलन केलं, त्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी बीड इथं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काही तरुणांनी राज्य सरकारचा निषेध केला. भर उन्हात अर्ध नग्न होऊन जरांगे यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुंबई इथं भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत तनपुरे यांच्या भाजप प्रवेश सोहळा पार पडला. तनपुरे यांच्यासह त्यांचे असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. तनपुरे यांच्यासारखा एक तरुण आणि अभ्यासू कार्यकर्ता आज भाजपसोबत जोडला गेला आहे, असं सांगत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांचं भाजपात स्वागत केलं. महायुती सरकारसोबत आल्यानंतर राहुरी मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांची चांगल्या प्रकारे सोडवणूक होईल आणि विकासाला आता अधिक गती मिळेल, असा विश्वास तनपुरे यांनी यावेळी व्यक्त केला.

****

विधान परिषद निवडणुकीसाठी कोकण विधान परिषद मतदारसंघासाठी शेतकरी कामगार पक्षानं पनवेल महानगरपालिकेतले विरोधी पक्ष नेते अरविंद म्हात्रे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान महायुतीकडून अद्यापही या मतदारसंघाबद्दल निर्णय झालेला नसला, तरी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांकडून निवडणुकीची तयारी सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

गोवा राज्याचा ४० वा स्थापना दिवस आज साजरा होत आहे. आजच्याच दिवशी १९८७ मध्ये गोव्याला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला होता. गोवा राज्याच्या स्थापना दिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी गोव्याच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

****

देशाचे संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आज सेवानिवृत्त झाले. नवी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांनी त्यांना गार्ड ऑफ ऑनर दिला. यानंतर चौहान यांनी युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण केलं. तिन्ही दलांच्या गार्ड ऑफ ऑनरनं सेवानिवृत्त होणं ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची भावना चौहान यांनी यावेळी व्यक्त केली. आपला कार्यकाळ समाधानकारक आणि उत्कृष्ट असल्याचंही ते म्हणाले. १९८१ मध्ये भारतीय लष्करात रुजु झालेले चौहान यांनी ४० वर्षांपेक्षा जास्त काळ लष्करात सेवा बजावली आहे. चौहान यांच्यानंतर लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी हे देशाचे नवे संरक्षण दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधतील. हा या मालिकेचा १३४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, तसंच एआयआर न्यूज या संकेतस्थळ आणि न्यूजऑनएअर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. याशिवाय, एआयआर न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेल्सवरही या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पूर्व नागपुरात भांडेवाडी इथे नव्याने सुरु झालेल्या शहरी घनकचरा प्रक्रिया केंद्राची पाहणी केली. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु झालेला हा देशातला पहिला खासगी गुंतवणुकीचा ड्राय डायजेशन प्रकल्प असल्याचं त्यांनी प्रसार माध्यमांना सांगितलं. यात भारतीय आणि नेदरलँडच्या खाजगी कंपन्यांची ३०० कोटी रुपयांची गुंतवणुक आहे. प्रकल्पात दरदिवशी बाराशे टन घनकचऱ्यावर प्रक्रिया करून दर दिवशी २८ टन ज्वलनशील वायू, १२० टन सेंद्रिय खत आणि ४०० टन आरडीएफ इंधनाची निर्मिती होणार

आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालू झाल्यावर वर्षभरात शहरातला कचऱ्याचा ढीग संपेल आणि त्याखालची जमीन इतर वापरासाठी उपलब्ध होईल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

****

छत्रपती संभाजीनगरच्या नवीन पाणीपुरवठा योजनेत पाण्याचा गढूळपणा नीचांकी पातळीवर आणण्यात यंत्रणेला यश आलं आहे. सुरवातीला पाण्याचा गढूळपणा २०० एनटीयू पेक्षा अधिक होता. आता हा गढूळपणा १५ एनटीयू पेक्षा कमी करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत पाण्याच्या अंतिम प्रयोगशाळा चाचण्या होणार आहेत. त्यानंतर लवकरच शहराला अतिरिक्त पाणीपुरवठा सुरू केला जाईल, असं महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांनी सांगितलं.

****

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागातल्या ८ आगारातील चालक, वाहक, यांत्रिक, तसंच प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल परवा १ जून रोजी प्रतिनिधीक स्वरुपात आगार पातळीवर सत्कार करण्यात येणार आहे. बीडच्या विभागीय कार्यालयात १ जून रोजी वर्धापन दिनानिमित्त २५ वर्ष विनाअपघात सेवा केल्याबद्दल सहा चालकांचा सपत्नीक सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि २५ हजार रुपये देऊन सत्कार करण्यात येणार आहे, विभागीय नियंत्रक अनुजा संजय दुसाने यांनी ही माहिती दिली. तसंच जिल्ह्यात २६० दिवस विना अपघात सेवा करणाऱ्या ५५७ चालकास सुरक्षित सेवा दिल्याबदल रोख बक्षिस देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

****

कृषी विभागाच्या पथकानं आज पहाटे गुजरातमधून धुळे जिल्ह्यात आणलेल्या प्रतिबंधित कापूस बियाण्यांचा साठा जप्त केला. या कारवाईदरम्यान कापसाच्या धनुष्य आणि फाल्कन या वाणांच्या बियाण्यांची २१ पाकिटं जप्त करण्यात आली असून या बियाण्यांची किंमत सुमारे ३१ हजार ३०० रुपये इतकी आहे. या प्रकरणी कृषी अधिकाऱ्यांनी धुळे शहर पोलिस ठाण्यात सरकारी फिर्याद नोंदवली आहे.

****

चंद्रपूर जिल्ह्यात चिचपल्ली इथल्या बांबू रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटरला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्याकडून तीन वर्षीय डिप्लोमा इन बांबू टेक्नॉलॉजी’

अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून हा अभ्यासक्रम सुरू होईल, या मान्यतेमुळे बीआरटीसी ही भारतातील बांबू टेक्नॉलॉजी विषयातील स्वतंत्र डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी एआयसीटीई मान्यता मिळवणारी पहिली संस्था ठरली आहे. या अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून, राज्यातला बांबू उद्योग, हरित तंत्रज्ञान, शाश्वत रोजगार आणि ग्रामीण औद्योगिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

****

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त आज सोलापूर विद्यापीठात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. खास धनगरी गजीनृत्य आणि ढोल-ताशांच्या निनादात निघालेल्या या शोभायात्रेने शहराचं लक्ष वेधून घेतलं.

****

सिंगापूर ओपन सुपर बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या उपांत्यफेरीच्या लढतीत सात्विक चिराग जोडीने दक्षिण कोरियाच्या जोडीचा २१-१९, २१-१८ असा सरळ दोन गेममध्ये पराभव केला. याच स्पर्धेत मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारतीय जोडी ध्रुव कपिला आणि तनिशा क्रास्टो यांचं आव्हान संपुष्टात आलं. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात जपानच्या जोडीने त्यांना २१-१६, १७-२१, २१-१३ असं पराभूत केलं.

****